# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** शासनाचे स्वच्छ भारत अभियान २.० (शहरी) मंजूर CSWAP
**{सा.आ.अ.विभाग}** अंतर्गत नागपूर महानगरपालिकेकरीता "भांडेवाडी, नागपूर येथे सॅनिटरी लॅन्डफील (Phase-I) निर्माण करण्याबाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) रु. १९,१६,७१,५९६/-" मान्यता प्रदान करणे व प्रशासकीय मंजूरीस्तव शासनाकडे सादर करण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेकरीता स्वच्छ भारत अभियान २.० (शहरी) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापानाचा सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल रु. २५२.८७ कोटीस राज्यशासनाच्या राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने ०३.०३.२०२३ च्या बैठकीमध्ये मान्यता प्रदान केलेली आहे.

तसेच स्वच्छ भारत अभियान २.० (शहरी) अंतर्गत नागपूर शहराकरीता घनकचरा व्यवस्थापनाचा कृती आराखडा (CSWAP) रु. २२४.१२ कोटीस राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने मान्यता प्रदान केलेली आहे. यामध्ये सॅनिटरी लॅन्डफील निर्माण करण्याकरीता रु. १०.७२ कोटीस मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालनालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४.०२.२०२३ चे आदेशान्वये नागपूर महानगरपालिकेचा मंजूर सुधारीत विस्तृत घनकचरा व्यवस्थापन अहवाल कार्यान्वित करण्याकरीता पॅनलवरील नोंदणीकृत सल्लागार मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांची नेमणूक करण्यात आलेली असून "भांडेवाडी, नागपूर येथे सॅनिटरी लॅन्डफील (Phase-I) निर्माण करण्याबाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) रु. १९,१६,७१,५९६/-" तयार करण्यात आलेला असून शासनाचे सूचनेअनुरुप नागपूर महानगरपालिकेचे मुख्य अभियंता यांचेद्वारे तांत्रिक मंजूरी आदेश क्र. CE/PWD/TS/३३५/२०२४-२५, दिनांक १६.१२.२०२४ अन्वये प्राप्त आहे.

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० च्या धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० राबविणे बाबत शासन निर्णय क्र.स्वमअ/2022/प्र.क.73/नवि 34 दि.15/07/2022 अन्वये "अ+", "अ" व "ब" वर्ग महानगरपालिका करीता घनकचरा व्यवस्थापनासाठी एकूण प्रकल्प राशीच्या २५% केंद्र शासनाचा हिस्सा तर ३५% राज्य शासनाचा व ४०% हिस्सा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचा असलेबाबत नमुद आहे. भांडेवाडी, नागपूर येथे सॅनिटरी लॅन्डफील (Phase-I) निर्माण करण्याबाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) रु. १९,१६,७१,५९६/- (Capex + Opex) पैकी रु. १२,६१,२५,३७४/- Capex ची रक्कम आहे. त्यानुसार केंद्र शासनाचा रु. ३,१५,३१,३४४/- तर राज्य शासनाचा रु. ४,४१,४३,८८१/- तर मनपाची ४०% रक्कमेनुसार होणारी रक्कम रु. ५,०४,५०,१४९/- मात्र होत आहे.

करीता, सदरहू प्रकल्पास्तव लागणारी मनपाची स्वहिश्याची रक्कम रु. ५,०४,५०,१४९/- Capex आणि रु. ६,५५,४६,२२२/- O&M च्या खर्चास मंजूरी प्रदान करणे, तसेच विस्तृत प्रकल्प अहवाल रु. १९,१६,७१,५९६/- ला मान्यता प्रदान करणे आणि विस्तृत प्रकल्प अहवाल राज्य शासनास प्रशासकीय मंजूरीस्तव पाठविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप :** सविस्तर विस्तृत प्रकल्प अहवाल नस्तीत उपलब्ध् आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 140/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 25/03/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार शासनाचे स्वच्छ भारत अभियान २.० (शहरी) मंजूर CSWAP अंतर्गत नागपूर महानगरपालिकेकरीता भांडेवाडी, नागपूर येथे सॅनिटरी लॅन्डफील (Phase-I) निर्माण करण्याबाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) रु. १९,१६,७१,५९६/-" मान्यता प्रदान करणे व प्रशासकीय मंजूरीस्तव शासनाकडे सादर करण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेकरीता स्वच्छ भारत अभियान २.० (शहरी) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापानाचा सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल रु. २५२.८७ कोटीस राज्यशासनाच्या राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने ०३.०३.२०२३ च्या बैठकीमध्ये मान्यता प्रदान केलेली आहे.

तसेच स्वच्छ भारत अभियान २.० (शहरी) अंतर्गत नागपूर शहराकरीता घनकचरा व्यवस्थापनाचा कृती आराखडा (CSWAP) रु. २२४.१२ कोटीस राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने मान्यता प्रदान केलेली आहे. यामध्ये सॅनिटरी लॅन्डफील निर्माण करण्याकरीता रु. १०.७२ कोटीस मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालनालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४.०२.२०२३ चे आदेशान्वये नागपूर महानगरपालिकेचा मंजूर सुधारीत विस्तृत घनकचरा व्यवस्थापन अहवाल कार्यान्वित करण्याकरीता पॅनलवरील नोंदणीकृत सल्लागार मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांची नेमणूक करण्यात आलेली असून "भांडेवाडी, नागपूर येथे सॅनिटरी लॅन्डफील (Phase-I) निर्माण करण्याबाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) रु. १९,१६,७१,५९६/-" तयार करण्यात आलेला असून शासनाचे सूचनेअनुरुप नागपूर महानगरपालिकेचे मुख्य अभियंता यांचेद्वारे तांत्रिक मंजूरी आदेश क्र. CE/PWD/TS/३३५/२०२४-२५, दिनांक १६.१२.२०२४ अन्वये प्राप्त आहे.

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० च्या धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० राबविणे बाबत शासन निर्णय क्र.स्वमअ/2022/प्र.क.73/नवि 34 दि.15/07/2022 अन्वये "अ+", "अ" व "ब" वर्ग महानगरपालिका करीता घनकचरा व्यवस्थापनासाठी एकूण प्रकल्प राशीच्या २५% केंद्र शासनाचा हिस्सा तर ३५% राज्य शासनाचा व ४०% हिस्सा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचा असलेबाबत नमुद आहे. भांडेवाडी, नागपूर येथे सॅनिटरी लॅन्डफील (Phase-I) निर्माण करण्याबाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) रु. १९,१६,७१,५९६/- **(**Capex + Opex) पैकी रु. १२,६१,२५,३७४/- Capex ची रक्कम आहे. त्यानुसार केंद्र शासनाचा रु. ३,१५,३१,३४४/- तर राज्य शासनाचा रु. ४,४१,४३,८८१/- तर मनपाची ४०% रक्कमेनुसार होणारी रक्कम रु. ५,०४,५०,१४९/- मात्र होत आहे.

करीता, सदरहू प्रकल्पास्तव लागणारी मनपाची स्वहिश्याची रक्कम रु. ५,०४,५०,१४९/- Capex आणि रु. ६,५५,४६,२२२/- O&M च्या खर्चास मंजूरी प्रदान करणे, तसेच विस्तृत प्रकल्प अहवाल रु. १९,१६,७१,५९६/- ला मान्यता प्रदान करणे आणि विस्तृत प्रकल्प अहवाल राज्य शासनास प्रशासकीय मंजूरीस्तव पाठविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.